महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं दिनांक:-०६ जून, २०२२

## -: शुध्दीपत्रक:-

**विषय:-राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२-चलनाद्वारे परीक्षा शुल्क सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत**
संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०४५/२०२२ राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२, दिनांक ११ मे, २०२२

राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२ करीता ऑफलाईन पध्दतीने चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याच्या अंतिम दिनांकास भारतीय स्टेट बँकेत परीक्षा शुल्काचा भरणा करण्यात तांत्रिक अडचणी आल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव, प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज सादर केला आहे. तथापि, परीक्षा शुल्काचा भरणा अद्याप करु शकले नाहीत, अशा उमेदवारांना ऑफलाईन पध्दतीने चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येतआहे:-

(१) चलनाची प्रत घेण्याचा शेवटचा दिवस:- मंगळवार, दिनांक ७ जून, २०२२ २३:५९ पर्यंत

(२) भारतीय स्टेट बँकेत चलनाचा भरणा करण्याचा शेवटचा दिवस:-दिनांक ८ जून, २०२२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत

२. परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता संबंधित उमेदवारांनी आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीवरुन चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही नव्याने करावी. उमेदवारांनी यापूर्वी प्राप्त केलेल्या चलनाची वैधता समाप्त झालेली असल्याने अशा चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करणे शक्य होणार नाही.

३. भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत ऐनवेळी होणारी गैरसोय टाळण्याकरीता चलनाची प्रत डाऊनलोड/प्रिंट करणे व भारतीय स्टेट बँकेत चलनाचा भरणा करणे; यामध्ये किमान ३ तासांचा कालावधी राहील, याची संबंधित उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

ठिकाण:-मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग